नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
शाखा औरंगाबाद.

जा.क्र. भोगवटा प्रमाणपत्र /मौ. कुंभेफळ/ता.औरंगाबाद/ग.क्र.३३०/ससंनर-औ/2489 औरंगाबाद
दि. 9/8/2019

प्रति,

मा. जिल्हाधिकारी,
औरंगाबाद.

विषय :- **भागशः भोगवटा प्रमाणपत्र मिळणे बाबत**
मौ. कुंभेफळ ता. जि. औरंगाबाद येथील गट क्र. ३३० पै.मधील मंजूर अभिन्यासातील रो हाऊस क्र. ९ ते १६, १७ ते २८ व ॲमेनिटी भूखंडावरील वापराच्या बांधकामाबाबत.

संदर्भ :- आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.२०१८/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/ मौ. कुंभेफळ ता. औरंगाबाद/प्र.क्र. ४२४, दिनांक २२.११.२०१८.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये विषयांकित प्रकरणी मौ. कुंभेफळ ता. जि. औरंगाबाद येथील गट क्र. ३३० पै. निवासी (ग्रुप हौसींग) वापराच्या रो हाऊस क्र. ९ ते १६, १७ ते २८ व ॲमेनिटी भूखंडावरील बांधकामाचे क्षेत्र १०५३.३३ चौ.मी. व १९६.६२ चौ.मी. बांधकामाचे भोगवटा प्रमाणपत्र देणे बाबत या कार्यालयाचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत.

सदर प्रकरणी या कार्यालयाने रहिवास प्रयोजनासाठीच्या अभिन्यासास पत्र क्र. अकृप/मौ.कुंभेफळ/ता.औबाद/ग.नं.३३० पै./१५६८, दि. २१.०७.२०१६ अन्वये रहिवास वापरासाठी अंतिम मंजूरीची शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आदेश क्र.२०१६/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौ. कुंभेफळ ता. औरंगाबाद/प्र.क्र. ११४, दिनांक ०१.०८.२०१६ अन्वये अकृषीक आदेश पारीत केलेला आहे. त्यानुसार या कार्यालयाने पत्र क्र. बांधकाम परवानगी/मौ.कुंभेफळ/ता.औरंगाबाद/बां.प.१५५//ग.नं.३३०/ससंऔ/२०९१, दिनांक १४.१०.२०१६ अन्वये बांधकाम परवानगीची शिफारस केलेली आहे. त्या अनुषंगाने मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी आदेश क्र.२०१६/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौ. कुंभेफळ ता. औरंगाबाद/प्र.क्र. ११४, दिनांक २०.०२.२०१७ अन्वये बांधकाम परवाना आदेश पारीत केलेला आहे.

आता सदर प्रकरणी भोगवटा प्रमाणपत्राबाबत या कार्यालयाचा अभिप्राय अपेक्षिलेला आहे. सदर प्रकरणात संबंधीत वास्तुविशारद यांनी प्रत्यक्ष जागेवरील बांधीव क्षेत्राचे अनुषंगाने मंजूर बांधकाम परवानगी नकाशानुसार बांधकाम पूर्णत्वाचे नकाशे जागेवर तपासणी करुन सादर केलेले असून त्यानुसार नकाशाचे अनुषंगाने छाननी करण्यात आलेली आहे. या कार्यालयाने बांधकाम परवानगीची शिफारस केलेल्या नकाशानुसार व आपल्या कार्यालयाने बांधकाम परवाना दिल्यानुसार सामासिक अंतरे, खोल्यांची रुंदी, लांबी, क्षेत्र व चटई क्षेत्र निर्देशांक इत्यादी बाबी एकसमान आहे. एकूण बांधकाम सर्वसाधारण योग्य असल्याने खालील अटी व शर्तींवर भोगवटा प्रमाणपत्र बाबत शिफारस करण्यात येत आहे. यासोबत भोगवटा प्रमाणपत्र व नकाशे स्वाक्षरीस्तव सादर करण्यात येत आहे.

अटीः-

१) सदर प्रकरणाचे स्ट्रक्चरल स्टॅबेलीटी प्रमाणपत्र व भुकंपरोधक प्रमाणपत्र सादर केलेले असून त्याबाबत स्ट्रक्चरल इंजिनिअर/वास्तुविशारद यांची जबाबदारी राहील.
२) या कार्यालयाचे रहिवास वापरासाठी अंतिम मंजूरीची शिफारस केलेले पत्र क्र. १५६८, दि. २१.०७.२०१६ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३) पूर्व मंजूर बांधकाम परवानगी नकाशा मधील बांधकामापेक्षा अतिरिक्त बांधकाम भविष्यात केल्यास या बाबत संपूर्ण जबाबदारी संबंधीत वास्तुविशारद/जमीन मालक यांची राहील.
४) मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाचे अकृषिक आदेश क्र.२०१६/मशाका/जमीन-१/एनएपी-३४/मौ. कुंभेफळ ता.औरंगाबाद/प्र.क्र. ११४, दिनांक ०१.०८.२०१६ धील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.
५) या कार्यालयाचे बांधकाम परवानगीचे पत्र क्र. २०९१, दि. १४.१०.२०१६ व बांधकान परवाना आदेश क्र. ११४, दि.२०.०२.२०१७ मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) सदर बांधकामाबाबत अर्जदार यांनी ज्योत्याचे पुर्णत्वाचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

आपला,

सोबतः - वरील प्रमाणे

प्र.सहायक संचालक, नगर रचना,
औरंगाबाद.

प्रत :- अर्जदार :- सुधीर लक्ष्मण मुळे तर्फे विकसनकर्ता भाईश्री व्हेंचर्स तर्फे भागीदार श्री. प्रविण धनराज सोमाणी यांना माहितीस्तव सादर.